**केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या दि.३.११.२००५ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वन जमिनीवरील अतिक्रमणदारांची पात्रता तपासण्यासाठी महाराष्ट्रात गावपातळी तालुकापातळी व जिल्हा पातळीवर समिती नेमण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २००६/प्र.क्र.९८/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २३ एप्रिल , २००७

**वाचा** :- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलईएन १०७८/३४८३/ग-१, दि.२७.१२.१९७८.

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण १०९५/२३२५/प्र.क्र.९६/ज-१, दि.२०.१२.१९९५.

३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण २००२/प्र.क्र.३७२/ज-१, दि.१० ऑक्टोबर, २००२.

**प्रस्तावना :-**

पड जमिनीवरील / गायरान जमिनीवरील आणि वन जमिनीवरील शेती प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतचे आदेश उक्त शासन निर्णयान्वये पारीत करण्यात आले आहेत. त्यानुसार अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी तयार केलेल्या पात्रता यादीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दावे दाखल करण्यात आले होते. या दाव्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण १०९५/२३२५/प्र.क्र.९६/ज-१, दि. २०.१२.१९९५ अन्वये महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक उपजिल्हाधिकारी, एक सहाय्यक वनसंरक्षक व आदिवासी आयुक्त यांनी पदनिर्देशित केलेले एक सहाय्यक प्रकल्प अधिकारी वर्ग-२ यांचा समावेश असलेली एक समिती संबधित जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखली स्थापन करण्यात आली होती. त्या समितीने आदिवासींच्या ताब्यातील वन जमिनीवरील अतिक्रमणांचे दावे तपासून संबंधित अतिक्रमणदारांना त्यांचे हक्क शाबीत करण्यासाठी आणि पुरावे दाखल करण्यासाठी संधी देऊन अतिक्रमणे नियमानुकूल करण्यास पात्र आहेत किंवा कसे याची तपासणी करावयाची होती. या कामकाजास अचूकता व गती यावी

यासाठी शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण २००२/प्र.क्र.३७२/ज-१, दि.१० ऑक्टोबर, २००२ अन्वये गाव तसेच तालुका पातळीवर समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

आता केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने दि.३.११.२००५ च्या पत्रान्वये वन जमिनीवरील आदिवासीचे आणि जंगलामध्ये निवास करणाऱ्यांच्या (Forest dwellers on forest land) हक्कांची, वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार छाननी करताना अंगीकारावयाची मार्गदर्शक तत्त्वे विहित केली आहेत. त्या तत्त्वांनुसार दि.२५.१०.१९८० च्या कालावधीपर्यंतचे वन जमिनीवरील अतिक्रमणदारांचे दावे तपासावयाचे आहेत.

शासन निर्णय क्र. संकीर्ण २००२/प्र.क्र.३७२/ज-१, दिनांक १० ऑक्टोबर, २००२ अन्वये दि.३१.३.१९७८ पर्यंत वन जमिनीवरील अतिक्रमणदारांचे दावे तपासावयाचे आदेश देण्यात आले होते. परंतु केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने दिलेल्या आदेशानुसार आता दि.२५.१०.१९८० च्या कालावधीपर्यंचे वन जमिनीवरील अतिक्रमणदारांचे दावे तपासावयाचे आहेत आणि त्याबाबत केंद्र शासनाने दि.३.११.२००५ च्या पत्रानुसार मार्गदर्शक तत्त्वेही विहित केली आहेत. सदर मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये गाव पातळी, तालुका पातळी आणि जिल्हा पातळीवर पुढीलप्रमाणे समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

**<u>१.</u>** आदिवासींचे व अपात्र अतिक्रमणदारांव्यतिरीक्त जंगलात निवास करणाऱ्यांचे (Forest Dwellers on Forest Land) वनजमिनीवरील अतिक्रमणाचे दावे तपासण्यासाठी खालील सदस्यांचा अंतर्भाव असलेली **<u>स्थानिक समिती</u>** स्थापन करण्यात यावी.

अ) संबंधित गावाचा सरपंच

ब) संबंधित गावातील दोन जाणकार ज्येष्ठ नागरीक (यापैकी किमान एक महिला असावी) या दोन सदस्यांची नियुक्त या नियुक्तीच्या प्रयोजनार्थ विशेष सभा बोलावून ग्रामसभेने करावी.

क) संबंधित गावाचा तलाठी / पटवारी

ड) अध्यक्ष संयुक्त वन जमीन व्यवस्थापन समिती (अस्तित्वात असल्यास)

इ) वनरक्षक / वनपाल. हे समितीचे सचिव म्हणून काम करतील. तसेच समितीने घेतलेला निर्णय संबंधितांना कळविण्याची जबाबदारी याचेवर असेल.

**१.२** ग्रुप ग्रामपंचायतीतील गावासंदर्भात ग्रामपंचायतीच्या मुख्यालयाव्यतिरिक्तच्या इतर गावांसाठी संबंधित गावातून निवडून गेलेला ग्रामपंचायत सदस्य हा सदर समितीचा अध्यक्ष असेल. जेथे वन जमीन ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत नसेल तेथे स्थानिक जनतेने परंपरेनुसार निवडलेला नेता (मुखिया) हा सदर समितीचा अध्यक्ष असेल.

**२.** वर नमूद केलेल्या स्थानिक समितीने दिलेला निर्णय मान्य नसल्यास अशा अतिक्रमणदाराने आपले म्हणणे स्थानिक समितीचा निर्णय प्राप्त झालेपासून **३० दिवसांच्या आत तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीकडे** मांडावे. त्याकरीता तालुका पातळीवर खालील सदस्यांचा अंतर्भाव असलेली पुनर्विलोकन समिती स्थापन करण्यात यावी.

अ) जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला जिल्हा परिषद सदस्य हा पुनर्विलोकन समितीचा अध्यक्ष असेल.

ब) पंचायत समितीच्या सभापतींनी नामनिर्देशित केलेला पंचायत समितीतील सदस्य.

क) तहसिलदारांनी नामनिर्देशित केलेला नायब तहसिलदार

ड) सहाय्यक, आदिवासी विकास अधिकारी / सहाय्यक प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प)

इ) विभागीय वन अधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेला वनपरिक्षेत्र अधिकारी, हा अधिकारी संबंधित क्षेत्राचा असावा व तो समितीचा सचिव म्हणूनकाम करेल. समितीचा निर्णय संबंधितांना कळविण्याची जबाबदारी सचिव यांची असेल.

**३.** पुनर्विलोकन समितीने दिलेला निर्णय मान्य नसल्यास संबंधितांनी आपले म्हणणे निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जिल्हा पातळीवरील समितीसमोर मांडावे. जिल्हा पातळीवरील समितीमध्ये खालील सदस्यांचा अंतर्भाव असावा.

अ) जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला उपजिल्हाधिकारी हा समिती अध्यक्ष म्हणून काम पाहील.

ब) सहाय्यक वनरक्षक हे या समितीचे सचिव म्हणून काम पाहतील. समितीच्या बैठका आयोजित करणे व समितीचा निर्णय संबंधितांना कळविण्याची कार्यवाही सचिवांकडून केली जाईल.

क) आदिवासी विकास विभागाने नियुक्त केलेला प्रतिनिधी.

**४. समितीची कार्यपध्दती :-**

**४.१** दि. २५.१०.१९८० या दिनांकपर्यंत वनजमिनीवर अस्तित्वात असलेल्या सर्व अतिक्रमणदारांच्या दाव्यांवर निर्णय होणे आवश्यक आहे. तथापि असा निर्णय घेताना केंद्र शासनाच्या दि.१८.९.१९९० रोजीच्या तसेच दि.३.११.२००५ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक राहील.

**४.२** दावेदारांना विहित कार्यपध्दतीची माहिती व्हावी, अतिक्रमणदारांना त्यांचे दावे त्यांच्या भाषेत मांडणे सुलभ व्हावे, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील अतिक्रमणदारांचा जाण्या येण्याचा खर्च व वेळ वाचावा तसेच सर्व अतिक्रमणदारांपर्यंत पोहोचणे शक्य व्हावे व कोणत्याही दावेदारास दावा सादर करण्याची संधी मिळाली नाही अशी परिस्थिती उद्‌भवू नये यासाठी प्रत्येक गावात ग्रामसभा आयोजित करण्यात यावी.

**४.३** ग्रामसभेच्या तारखा व वेळा दर्शविणारे वेळापत्रक तयार करुन या वेळापत्रकास पुरेशी पूर्वप्रसिध्दी देण्यात यावी. या वेळापत्रकात खालील बाबींचा उल्लेख असावा.

अ. स्थानिक पातळीवरील समितीत सदस्य म्हणून समाविष्ट करावयाच दोन जेष्ठ जाणकार नागरीकांची निवड कोणत्या दिवशी व कोणत्या वेळेस संपन्न होणाऱ्या ग्रामसभेत होणार आहे.

ब. स्थानिक समिती कोणकोणत्या दिवशी अतिक्रमणदारांनी पुराव्यासहित सादर केलेले दावे दाखल करुन घेणार आहे.

क. दाखल करुन घेतलेल्या दाव्यांची स्थानिक समिती कोणकोणत्या दिवशी व कोणकोणत्या वेळेस तपासणी करणार आहे.

**४.४** या संपूर्ण मोहिमेत / कार्यक्रमात स्थानिक महिला व पुरुषांचा जास्तीत जास्त सहभाग असावा यासाठी तालुका पातळीवरील महसूल, वन व आदिवासी विकास विभागाचा प्रत्येकी एक अधिकारी समाविष्ट असलेले पथक स्थापन करण्यात यावे.

**४.५** अतिक्रमणदारांच्या पात्रतेची तपासणी करण्याच्या कार्यक्रमाची माहिती लोकांना मिळावी यासाठी स्थानिक भाषेत व पारंपारिक पध्दतीने प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच वन विभाग, संयुक्त वन व्यवस्थापन समित्या (अस्तित्वात असल्यास), ग्रामविकास विभाग, समाजकल्याण विभाग, एकात्मिक महिला व बाल कल्याण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांचेही या

कार्यक्रमाच्या पुरेशा प्रसिध्दीसाठी सहकार्य घेण्यात यावे. तसेच या कार्यक्रमाची माहिती अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचावी यासाठी स्वयंसहाय्यता गट व महिला मंडळांचेही सहकार्य घेण्यात यावे.

<u>४.६</u> या कार्यक्रमाबाबतचा उद्देश, कार्यप्रणाली इत्यादीबाबतची माहिती संबंधित गावातील चौकात, ग्रामपंचायत कार्यालयात तसेच पंचायत समिती कार्यालय, वन विभागाची कार्यालये, तहसील कार्यालये, आरोग्य व शिक्षण विभागाची कार्यालये इत्यादी सर्व कार्यालयात नोटीसबोर्डावर लावण्यात यावी. या कार्यक्रमाची सर्वंकष माहिती दुर्गम भागातील वसाहती व सर्वेक्षण न झालेल्या गावांमध्ये पोहोचविण्यासाठी वन विभागाने विशेष लक्ष पुरवावे.

<u>४.७</u> किमान तीन आठवडे पूर्वप्रसिध्दी देऊन स्थानिक समितीने अतिक्रमणदारांचे दावे दाखल करुन घेण्यासाठी ग्रामसभेची बैठक आयोजित करावी.

<u>४.८</u> ग्रामसभेमध्ये अतिक्रमणदारांनी त्यांचे परिपूर्ण दावे सादर केल्यानंतर किमान दोन आठवडयांनी पुन्हा अतिक्रमणदारांनी सादर केलेले दावे तपासण्यासाठी ग्रामसभा घेऊन या ग्रामसभेमध्ये सर्वांसमक्ष अतिक्रमणदारांचे दावे तपासण्यात यावेत.

<u>४.९</u> शक्यतोवर ग्रामसभेच्या सर्व बैठका या दुपारी उशिरा अथवा संध्याकाळी उशिरा आयोजित करण्यात याव्यात जेणेकरुन सर्वांना ग्रामसभेस उपस्थित राहणे शक्य होईल.

<u>४.१०</u> स्थानिक समितीने तपासून मंजूर केलेले अतिक्रमणदारांचे दावे तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीकडे सादर करण्यात यावेत.

<u>४.११</u> स्थानिक समितीने अतिक्रमणदाराच्या दाव्याबाबतचे आपले निष्कर्ष ग्रामसभेतच संबधित दावेदारास देणे बंधनकारक राहील.

<u>४.१२</u> तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीने स्थानिक समितीकडून प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव आपल्या शिफारशीसह जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर करावेत.

<u>४.१३</u> जिल्हा पातळीवरील समितीने तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीकडून शिफारशींसह प्राप्त झालेले प्रस्ताव निर्णित करताना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे :-

अ. दावेदाराचे अस्तित्व व वन जमिनीवरील त्याचा सततचा ताबा याची खात्री करण्याकरिता जिल्हा पातळीवरील समितीने सदर दावेदारांची (आदिवासी व जंगलात निवास करणाऱ्या व्यक्ती / अतिक्रमणदार) नावे सन १९८१, १९९१ व २००१ च्या जनगणनेत तसेच मतदार यादीत आपल्याची तपासणी करावी.

ब. आदिवासी व जंगलात निवास करत असल्याचा दावा करीत असलेले दावेदार हे दावा करीत असलेल्या जागेवर सन १९८० पूर्वीपासून निवास करीत असणे व दावा करीत असलेल्या जागेवर त्यांचा दाव्याची तपासणी करण्याच्या दिनांकापावेतो ताबा असणे आवश्यक आहे.

क. दावेदाराचा दावा करीत असलेल्या जागेवर सन १९८० पूर्वीपासून सातत्याने व सलग कब्जा नसलेली प्रकरणी जिल्हा पातळीवरील समितीकडून विचारात घेतली जाणार नाहीत.

ड. एखाद्या विशिष्ट आदिवासी जमातीचे अथवा जंगलात निवास करणाऱ्या दावेदाराचे वन जमिनीवरील व वनउपजावरील (Forest Produce) परंपरेने प्राप्त झालेल्या हक्कांचीही जिल्हा पातळीवरील समिती तपासणी करेल.

इ. स्थानिक समितीने फेटाळलेल्या अथवा प्रकरणपरत्वे तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीने फेटाळलेल्या दाव्याविरुध्दची अपीले निर्णित करणेपूर्वी अनुक्रमे तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीने व जिल्हा पातळीवरील समितीने संबंधित अपीलकर्त्यास किमान ३ आठवडे अगोदर सुनावणीसाठीची नोटीस देणे आवश्यक राहील.

## <u>५. स्थानिक अथवा तालुका पुनर्विलोकन समितीपुढे सादर करावयाच्या पुराव्याचे स्वरुप :-</u>

<u>५.१</u> जमीन ताब्यात असल्याच्या कालावधीबाबत कोणते पुरावे ग्राह्य धरण्यात यावेत याचा विचार करताना रहिवासाचा पुरावा हा अतिक्रमणदाराचा दावा / अतिक्रमणाचा कालावधी निर्णित करण्यासाठीचा निर्णायक पुरावा समजता येईल अशी परिस्थिती नसल्याने अतिक्रमणाचा कालावधी तपासताना प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारीत असलेले नैसर्गिक व परिस्थितीजन्य पुरावे तपासणे आवश्यक व शक्य आहे. प्रत्यक्ष परिस्थितीची (Ground Realities) पूर्णत: जाणीव असलेल्या स्थानिक समितीला असे नैसर्गिक व परिस्थितीजन्य पुरावे तपासण्याची संधी उपलब्ध असेल व माहितगार ग्रामस्थांचे मत / सल्ला घेऊन सलगरित्या अतिक्रमण (continuous Occupation) निश्चित केव्हापासून अस्तित्वात आहे याबाबतचा पुरावा नोंदवून घेणे स्थानिक समितीस शक्य आहे. असा पुरावा नोंदवून घेताना व त्यावर निर्णय घेताना संशयाचा फायदा दावेदारास देणे आवश्यक आहे.

__५.२__ अतिक्रमणाच्या कालावधीबाबत मौखिक व कागदपत्रांच्या स्वरुपातील विविध पुरावे हे सादर केले जाण्याची शक्यत विचारात घेता समिती खालील प्रकारचे पुरावे स्वीकारु शकेल.

अ. शासकीय अथवा निमशासकीय स्त्रोताकडून प्राप्त झालेला कागदोपत्री पुरावा.

ब. यापूर्वी झालेल्या संशोधनातील कागदोपत्री पुरावा तसेच नामांकित संस्थेने केलेल्या दस्तऐवजीकरणातील कागदोपत्री पुरावा. (यामध्ये सर्वेक्षणाअंती तयार केलेल्या नकाशांचाही समावेश करता येईल)

क. अतिक्रमणाचा दावा केलेल्या स्थळास तलाठ्यासमवेत समितीच्या तीनपेक्षा अधिक सदस्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन गोळा केलेला पुरावा.

__५.३__ स्थानिक समितीने अतिक्रमणाच्या कालावधीबाबत निश्चितपणे / ठामपणे निर्णय घेणे आवश्यक व महत्वाचे आहे. पात्र प्रकरणांबाबत आपली निरीक्षणे नोंदविताना खालील दोन मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

अ. दावेदाराने वन जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासंदर्भातील शासनाच्या संबधित निर्णयातील इतर सर्व अटींची पूर्तता केली असणे आवश्यक आहे. जर राज्य शासनाने यासंदर्भात घेतलेल्या निर्णयातील काही बाबी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने सन १९९० साली निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत नसल्यास केंद्र शासनाच्या सन १९९० साली निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना अंतिम समजण्यात याव्यात.

ब. सन १९८० पूर्वीची वन जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासंदर्भात राज्य शासनाने काही आदेश निर्गमित केले नसल्यास अशा प्रकरणी केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने सन १९९० साली निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

## __६. दावे स्वीकारण्याचे निकष__

दावेदारांचे दावे निर्णित करताना स्थानिक समितीने सन १९९० साली केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या चौकटीत राहून खालील निकष विचारात घ्यावेत :-

**अ.** दावेदाराने सादर केलेले कागदोपत्री पुरावे शासकीय / निमशासकीय स्त्रोतांकडून अथवा इतर अनुषंगिक स्त्रोतांकडून प्राप्त झाले असल्यास तसेच दावा जमीन ही सन १९८० पुर्वीपासून दावा सादर करण्याच्या दिनांकापर्यंत सातत्याने दावेदाराच्या ताब्यात असल्याचे पुराव्यावरुन निष्पन्न होत असल्यास असे पुरावे स्वीकारण्यात यावेत.

**ब.** दावेदाराने त्याच्या दाव्यापुष्ट्यर्थ कागदोपत्री पुरावे सादर केलेले नसल्यास मात्र इतर अनुषंगिक पुराव्यांचे आधारे दावेदाराचा दावा रास्त व कायदेशीर असल्याचे ग्रामसभेचे मत

झाल्यास असे दावे स्थानिक समितीने काळजीपर्वूक तपासावेत व संशयाचा फायदा दावेदारास देण्यात यावा. **स्थानिक समितीचा निर्णय हा साध्या बहुमताने घेण्यात यावा.**

**क.** दावेदाराने त्याच्या दाव्यापुष्ट्यर्थ कागदोपत्री पुरावे सादर केलेले नसल्यास तसेच ग्रामसभेनेही दावेदाराचा दावा फेटाळला असल्यास असे दावे स्थानिक समितीने काळजीपूर्वक तपासले पाहिजेत व असे दावे तालुका पातळीवरील पुनर्विलोकन समितीकडे संदर्भित करण्यात यावेत.

**ड.** केंद्र शासनाच्या सन १९९० च्या मार्गदर्शक तत्त्वांच्या चौकटीत मंजूर केलेले सर्व दावे जिल्हास्तरीय समितीने राज्य शासनाच्या नोडल ऑफिसर (वन संधारण) यांचेकडे सादर करावेत व तद्नंतर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांच्या शिफारशींसह हे दावे राज्य शासनास सादर करावेत.

**इ.** फेटाळण्यात आलेल्या दाव्यांचे संदर्भात अशा दावेदारांचे पुनर्वसन अन्यत्र शासनाच्या मालकीच्या वनेतर जमिनीवर करण्यात यावे.

**ई.** राष्ट्रीय उद्याने अथवा अभयारण्यांच्या बाबतीत अतिक्रमणदारांचे पुनर्वसन अन्यत्र शासनाच्या मालकीच्या वनेतर जमिनीवर करण्याबाबत विचार करण्यात यावा.

**प.** केंद्र शासनास पाठवावयाचे प्रस्ताव हे वन संवर्धन अधिनियम, १९८० मध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन करुन तसेच योग्य त्या कार्यप्रणालीचा अवलंब करुनच सादर केले जावेत तसेच या प्रस्तावातच मंजूर करावयाच्या दाव्यात अंतर्भूत असलेल्या जमिनींचे कायमस्वरुपीीमांकन व असे दावे मंजूर केल्यामुळे आवश्यक तेवढे क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाचाही अंतर्भाव असावा.

## ७. तालुकापातळीवरील प्रसिध्दी व प्रशिक्षणासाठी कार्यशाळा

७.१ सदर कार्यक्रम शीघ्रगतीने पूर्ण व्हावा यासाठी पूर्वनियोजित प्रसिध्दी करण्यात यावी. कार्यक्रमाची पूर्वप्रसिध्दी केल्यानंतर व प्रत्यक्ष दावे तपासण्यापूर्वी जिल्हा समितीने माहितगार अशासकीय संस्थांच्या मदतीने प्रशिक्षणासाठी कार्यशाळा आयोजित कराव्यात. या कार्यशाळेत सरपंच, उपसरपंच, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य, वन विभागाचे अधिकारी / कर्मचारी, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी / कर्मचारी, जेष्ठ नागरीक, महसूल विभागाचे अधिकारी / कर्मचारी, तलाठी व स्थानिक समितीचे सदस्य या सर्वांना कार्यक्रमाची सर्वंकष माहिती देण्यात यावी.

**७.२** अशासकीय संस्था, कार्यकर्ते व पत्रकारांसाठी स्वतंत्ररीत्या कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

**७.३** संपूर्ण कार्यक्रमाचे पूर्वनियोजन काटेकोरपणे केल्यानंतरच ग्रामसभा आयोजित केल्या जाव्यात.

## ८. इतर बाबी

**८.१** या संपूर्ण कार्यक्रमाच्या प्रगतीचे संनियंत्रण करणेसाठी स्टेट लेव्हल टास्क फोर्स गठीत करण्यात यावा. मुख्य सचिव हे या टास्क फोर्सचे अध्यक्ष असतील व प्रधान मुख्य वन संरक्षक हे या टास्क फोर्सचे सहअध्यक्ष म्हणून काम पाहतील. या टास्क फोर्सच्या दर तीन महिन्यांनी बैठका घेतल्या जाव्यात व कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेतला जावा.

**८.२ संपूर्ण कार्यक्रम एक वर्षाच्या आत पूर्ण करण्यात यावा.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
**(प्र. ज. मुळे)**
**कार्यासन अधिकारी**
**महसूल व वन विभाग**

**प्रत :** १) मा. मुख्य सचिव
२) अपर मुख्य सचिव ( वने) महसूल व वन विभाग ,मंत्रालय ,मुंबई -४०००३२.
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) सर्व वनसंरक्षक.
७) आदिवासी आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
८) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय.
९) सर्व उपविभागीय अधिकारी.
१०) सर्व तहसिलदार.

११) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, सहावा मजला, विधानभवन, मुंबई.

१२) सर्व मंत्रालयीन विभाग.

१३) महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.

१४) कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई निवडनस्ती.